माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२२८८**

**अपिलार्थी श्री. आनंद पारकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
कार्यकारी अभियंता, कुर्ला मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, कक्ष क्र. ३४१, दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा (पू), मुंबई- ४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**
कार्यकारी अभियंता, कुर्ला मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, कक्ष क्र. ३४१, दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा (पू), मुंबई- ४०० ०५१

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १९.११.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.०३.२०२४ | १०.०४.२०२४ | ३०.०४.२०२४ | ०५.०६.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.०७.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये प्रथम अपील दाखल केल्यानंतरही माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. १८.०३.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"आपल्या कार्यालयातील पत्र जा.क्र. मु.मं./ का.अ./उ.वि.४/कु.वि./३५२/१४ दि. ०७.०३.२०२४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर प्रकरणात शहर दिवाणी सत्र न्यायालयाने जारी केलेले स्थगितीच्या आदेशाची प्रत मिळणेबाबत."*

जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ३०.०४.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि.१८.११.२०२५ आयोगास सादर करुन नमुद केले की, आपणास विनंती करतो की, उद्याच्या सुनावणी ऐवजी पुढील तारीख देण्यात यावी भविष्यात अपीलाची सुनावणी निश्चित करण्यापूर्वी किंवा निश्चित केलेल्या दिनांक पूर्वी माझ्या मोबाईलवर संपर्क करुन किंवा मला पत्र पाठवून मला कमीत कमी ८ दिवस आधी कळवावे. जेणेकरुन मला तिथे उपस्थित राहण्याची वाजवी संधी मिळेल.

..२/-

४. उपलब्ध अभिलेखावरुन आयोगाच्या असे निदर्शनास येते की, अपिलार्थींना दि. २९.१०.२०२५ रोजी सुनावणी नोटीस निर्गमित करण्यात आलेली आहे व प्रचलित कार्यपध्दतीनुसार अपिलार्थींना मोबाईल क्रमांकावर संपर्क साधने अपेक्षित नाहीत.

५. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे व संयुक्त स्वाक्षरीचे लेखी निवेदन दि. १८.११.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अर्जासमवेत या कार्यालयाच्या सलग्न पत्रात अर्जदार विचारणा करत असलेल्या Stay Order चा उल्लेख नाही अपिलार्थी श्री. आनंद श्रीधर पारकर यांनी दि. १८.०३.२०२४ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागणी केलेली माहिती कार्यालयीन नस्तीत उपलब्ध नसल्याने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांचे कडुन जा.क्र. २२०/२०२४ दि. १०.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अर्जदारास कळविण्यात आले आहे की, "अर्जदाराने विचारणा केलेली माहिती कार्यालयीन नस्तीत उपलब्ध नाही व तरी संबंधित नस्ती पडताळणी करावयाची असल्यास कार्यालयीन वेळेत नस्ती पडताळणी करावी व माहिती उपलब्ध असल्याचे आढलून आल्यास योग्य ते शुल्क अदा केल्यास माहिती उपलब्ध करुन दिली जाईल."

दि. १८.०३.२०२४ रोजी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दि. ३०.०४.२०२५ रोजीचा प्रथम अपिल अर्ज अपिल अधिकारी तथा उप अभियंता, उपविभाग ४, कार्यकारी अभियंता कुर्ला, मुंबई मंडळ या कार्यालयास प्राप्त झाला होता. सदर अपिल अर्जाच्या अनुषंगाने दि. २९.०५.२०२५ रोजी सुनावणीस उपस्थित राहणे बाबत अपिलार्थी यांस जा. क्र. २४८ दि. २३.०५.२०२४ अन्वये कळविले आहे.

प्रथम अपिल सुनावणीस दि. २९.०५.२०२५ रोजी अपिलार्थी श्री. आनंद श्रीधर पारकर उपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांचेकडुन नस्तीत उपलब्ध नसलेली माहिती अर्जदारास देणे शक्य नसल्याने अर्जदार श्री आनंद पारकर यांनी दि. १८.०३.२०२४ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेल्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी जा.क्र. २२०/२०२४ दि. १०.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अर्जदारास उचित उत्तर दिल्याचे दिसुन आले आहे.

अपिलार्थी श्री. आनंद श्रीधर पारकर यांच्या द्वितीय अपिल सुनावणीच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेल्या अर्जात मागणी केलेली मा. शहर दिवाणी न्यायालयीन प्रकरणातील स्टे ऑर्डर कार्यालयीन नस्तीत उपलब्ध नसल्याने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी अर्जदार यांस तसे कळविले आहे. तसेच कार्यालयीन संबंधित नस्ती पडताळणी करावयाची असल्यास कार्यालयीन वेळेत नस्ती पडताळणी करून माहिती उपलब्ध असल्याचे आढळून आल्यास ती उपलब्ध करून देण्यात येईल असे देखील कळविले आहे. अपिलाशी यांनी सदर प्रकरणातील कार्यालयीन नस्तीचे परिक्षण केले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांचेकडुन नस्तीत उपलब्ध नसलेली माहिती अर्जदारास देणे शक्य नव्हते तसे अर्जदारास कळविले आहे.

..३/-

६. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १९.११.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग बृहन्मुंबई